NMC/PTC/OWL/2021/50
नाशिक महानगरपालिका, नाशिक
कर आकारणी विभाग
जा.क्र.म.का/कर/कक्ष-१/ ४33/२०२१
दिनांक : २१/ ०१ / २०२१

## कार्यालयीन आदेश

कर आकारणी विभागातील, मालमत्ता कराचे चालु वित्तीय वर्षाचे वसुली इष्टांक पुर्ण करणे करीता, दि. २३/०१/२०२१ ते दि. ३१/०३/२०२१ या कालावधीतील सर्व शनिवार व रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी विभागीय कार्यालयातील कर आकारणी विभाग, भरणा स्विकारणेकामी नागरी सुविधा केंद्र, विभागातील कोषागार (लेखापाल) तसेच मुख्यालयातील नियंत्रणा कामी कर आकारणी विभागा इत्यादी विभागाचे कामकाज सुरु ठेवण्यात यावे.

सदर कालावधीमध्ये थकबाकीदारांना नोटिसा देणे, तगादे करणे, जप्ती (अटकावणी) अधिपत्र बजावणे, मोठया प्रमाणात वसुली मोहिम राबविणे, इ. तद्अनुषंगीक वसूली कामकाज करण्यात यावेत. सदर कालावधीत वसुली कर्मचाऱ्यांची अतितातडीची बाब वगळता रजा देण्यात येऊ नये. सदर कामकाजा करीता वसुलीकरीता नियुक्त करण्यात आलेले अधिकारी, भाग निरिक्षक व नियुक्त भागांचे कर्मचारी, नागरी सुविधा केंद्राचे नियंत्रण कर्मचारी, कोषागार विभागातील कर्मचारी, इत्यादी कामकाज करतील.

सुट्टीच्या दिवशी करांचा भरणा स्विकारणेकामी नागरी सुविधा केंद्र सुरु ठेवणे, नागरी सुविधा केंद्रावरील जमा झालेली रोख रक्कम तसेच धनादेश हे विभागातील कोषागार, तसेच कोषागारत जमा झालेल्या रकमेची सुरक्षा ठेवणे इत्यादी बाबत संबंधीत विभागाचे, विभाग प्रमुखांनी त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अवगत करुन सुचना देण्यात याव्यात.

नेमुण दिलेल्या भागाची/कार्यक्षेत्राची १०० टक्के वसुली करीता कसोशीने प्रयत्न करणेत यावे तसेच न झाल्यास सर्व विभागीय अधिकारी/भाग निरिक्षक व संबंधीत लिपीक/कर्मचारी यांचेवर शिस्त भंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर आदेश संबंधीतांना अवगत करुन तशी स्वाक्षरी घेण्यात यावी.

सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(स्वाक्षरी) २१/०१/२१
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

प्रत
१. उपआयुक्त (कर), मनपा नाशिक
२. मुख्यलेखाधिकारी, वित्त व लेखा विभाग, मनपा नाशिक
३. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मनपा नाशिक
४. सुरक्षा अधिकारी, मनपा नाशिक
५. सर्व विभागीय अधिकारी, मनपा नाशिक
६. सर्व वसुली निरिक्षक व कर्मचारी,मनपा नाशिक
७. नागरी सुविधा केंद्रातील नियंत्रण कर्मचारी
८. आदेश फाईल
९. स्थळप्रत

श्री आहेर, NMC website whatsapp on 9r ... 21/01/2021

माहिती व तंत्रज्ञान विभाग
जा.क्र. ......... दिनांक / /२०
आ.क्र. 922 ...... दिनांक 21/1/2021

Scanned by CamScanner